# सूचना –

पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतिक आणि कला धोरण म.न.पा.च्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. शहरातील कलावंतांनी आणि नागरीकांनी सांस्कृतिक आणि कला धोरणा बाबतच्या सुचना आणि अभिप्राय दिनांक २१/०८/२०१३ अखेर खालील पत्यावर पाठवाव्यात. दिनांक २१/०८/२०१३ नंतर येणा-या सुचना आणि अभिप्राय विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घेणेत यावी.

१) ई – मेल – p.tupe@pcmcindia.gov.in

२) लिखीत स्वरुपात पाठवावयाचा पत्ता – सह शहर अभियंता (वि/यां) यांचे कार्यालय, विद्युत मुख्य कार्यालय, पहिला मजला, पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्य कार्यालय, मुंबई - पुणे महामार्गालगत, पिंपरी, पुणे - ४११ ०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८

## सांस्कृतिक आणि कला धोरण

## “प्रस्तावना”

- संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि महासाधू मोरया गोसावी या महान संतांचा धार्मिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक वारसा लाभलेली, त्याच प्रमाणे थोर स्वातंत्र्य सेनानी क्रांतिवीर चापेकर बंधूंची ही भूमी आहे. पवना, इंद्रायणी आणि मुळा या तीन नद्यांचे सान्निध्य लाभलेली आणि वाहन उद्योगात अग्रगण्य राहिलेली अशी ही उद्योग नगरी आहे.

- पिंपरी चिंचवड शहरात, भारत देशाच्या अनेक प्रांतातील नागरीक नोकरी आणि व्यवसायाच्या निमित्ताने स्थायिक झालेले आहेत. विशेषतः अनेक प्रांतातून स्थानांतरण करुन स्थायिक झालेले बहुभाषिक, बहुप्रांतिय आणि महाराष्ट्रातील मराठी भाषिक असे सारे रहिवासी सण आणि उत्सवाच्या माध्यमातून आपल्या राज्यातील पारंपारिक संस्कृतीचे आणि कलांचे सादरीकरण आणि संवर्धन, आपआपल्या परीसरात गुण्या गोविंदाने आणि एकोप्याने करीत आलेले आहेत. बहुभाषिक आणि बहुप्रांतिय रहिवाशांच्या वास्तव्याने पिंपरी चिंचवड शहर ही एक भारताची “छोटी प्रतिकृती” बनलेली आहे.

- शहरातील अनेक कलावंतांना, त्यांच्या मधील कलागुणांची उपजत जाण आणि आवड असून सुद्धा ती जनता जनार्दनाला आणि रसिक प्रेक्षकांना पोहोचविण्याचे प्रभावी साधन पूर्वी उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्यांच्या मधील सुप्त कला-गुणांना वाव मिळत नव्हता.

  पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर कला आणि संस्कृतीचा विकासासाठी महानगरपालिकेच्या विविध उपक्रमांमधून आणि खाजगी संस्थाच्या माध्यमातून सांस्कृतिक आणि कलाविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यास सुरुवात झाली.

- प्रथमतः महानगरपालिकेच्या वर्धापन दिनाच्या माध्यमातून शहरातील कला, क्रिडा आणि सामाजिक स्तरावर उत्तम कार्य केलेल्या नामवंतांना पुरस्कार देवून गौरविण्यास प्रारंभ करण्यात आला. तसेच त्यानिमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याच प्रमाणे विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे नियोजन करण्यात आले.

- सन 1998 पासून महानगरपालिकेने शास्त्रीय गायन, वादन आणि नृत्य यावर आधारीत स्वरसागर संगीत महोत्सवाचे आयोजन सुरु करण्यात आले. सलग चौदा वर्षे या महोत्सवातून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कलावंतांनी गायन, वादन आणि नृत्यावर आधारीत वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे सादरीकरण केले त्यामुळे शहराचे "सांस्कृतिक प्रगतीचे चक्र" गतीमान झाले आहे. स्थानिक आणि होतकरु कलावंतांना या महोत्सवामधून आपली कला सादर करण्याची संधी मिळाल्याने ते प्रोत्साहित झाले आहेत. या महोत्सवामध्ये मागील दहा वर्षांपासून विख्यात कलावंतांना महानगरपालिकेतर्फे स्वरसागर पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येते. अल्पावधीत लोकप्रिय झालेला हा संगीत महोत्सव सांस्कृतिक वाटचालीमध्ये शहराचा मानबिंदू ठरलेला आहे.

- पिंपरी चिंचवड म.न.पा.ने निगडी प्राधिकरण येथील म.न.पा.च्या इमारतीमध्ये  सन 2001मध्ये संगीत अकादमीची स्थापना केली. या अकादमीत शास्त्रीय गायन, तबला, हार्मोनियम, सुगम संगीत या विषयांचे विद्यार्थ्यांना नाममात्र शुल्कांमध्ये शिक्षण दिले जाते. शहरातील विविध भागातील विद्यार्थ्यांना प्रारंभिक ते विशारद पूर्ण पर्यंतचे शिक्षण येथे दिले जाते, त्याच प्रमाणे मासिक संगीत सभेचे संगीत अकादमीमध्ये आयोजन केले जाते.

- छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या महोत्सवांमध्ये अनेक सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक तसेच विचार मंथनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच जागतिक महिला दिनानिमित्त आणि

महिला बचत गटाच्या माध्यमातून “पवनाथडी” जत्रा आणि इतर वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहराचे सांस्कृतिक आणि कला धोरण निश्चित करण्याकरीता, शहरातील गायन, वादन, चित्रपट, नृत्य, काव्य, नाट्य, लोककला तसेच हस्तकला, शिल्पकला, चित्रकला, किर्तनकला या क्षेत्रातील कलावंत, जाणकार, तज्ञ तसेच अभिनेते, निवेदक, व्याख्याते त्याच प्रमाणे रांगोळी, मेहेंदी, पाककला, रंगभूषा, वेषभूषा क्षेत्रातील कलावंत, विविध सांस्कृतिक संस्थांचे संस्थापक, कवी, साहित्यिक अशा मान्यवरांना दिनांक 23.01.2013 रोजी बैठकीस निमंत्रित केले होते. या बैठकीमध्ये त्यांनी आपली मनोगते व्यक्त केली तसेच लिखित स्वरुपात म.न.पा.स माहिती सादर केली. सदरची सर्व माहिती व त्यामधील मुद्दे संकलित करण्यात येवून महत्वांच्या मुद्यांच्या आधारे सांस्कृतिक आणि कला धोरणाची मुलभूत तत्वे आणि कार्यप्रणाली ठरविण्यात आलेली आहे.

# सांस्कृतिक आणि कला धोरणाची मुलभूत तत्वे

१) पिंपरी चिंचवड शहरातील नगरवासियांना आणि रसिक प्रेक्षकांना वैविध्यपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमांचा आस्वाद घेता यावा, यासाठी शहरामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आणि कलामहोत्सवांचे आयोजन करुन, विविध कलांच्या माध्यमातून, श्रवणातून, सादरीकरणातून, शिक्षणातून आणि प्रत्यक्ष सहभागातून त्यांच्यामध्ये सांस्कृतिक आणि कले बाबतची अभिरुची निर्माण करुन ती समृद्ध आणि संपन्न करणे. या सांस्कृतिक आणि कलांच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये सामाजिक सामंजस्य, समरसता आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना भारतीय संविधानाच्या मूळ उद्दिष्टानुसार वृद्धींगत करणे हे या सांस्कृतिक आणि कला धोरणाचे प्रमुख उद्धीष्ट आहे.

२) पिंपरी चिंचवड शहरातील सर्व समाज घटकांना सामावून घेताना आणि त्यांच्यामधील वैविध्यपूर्ण कलांना उत्तेजन देताना सर्व क्षेत्रातील कलावंत, जे आपल्या कलागुणांचा विकास करण्याचा प्रयत्न करतील, तसेच विधायक सांस्कृतिक मुल्यांची जपणूक करुन भारतीय संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याशी बांधील राहून आपल्या शहराचे आणि देशाचे नांव उज्वल करण्यास कटिबद्ध राहतील, अशा कलावंतांना सर्वार्थाने प्रोत्साहित करुन त्यांच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे.

३) पिंपरी चिंचवड शहरामध्ये, सन्माननीय महापौर, सर्व सन्माननीय पदाधिकारी, नगरसदस्य, नगरसदस्या, सांस्कृतिक संस्था यांच्या सहकार्याने आणि समन्वयाने शालेय विद्यार्थी, युवक, युवती आणि उपजत जाण असलेल्या विविध क्षेत्रातील कलावंतांमध्ये जागृती करणे. अंध, अपंग, विकलांग तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश करुन त्यांना वेगवेगळया कलांचे क्रमिक शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणे. विशेषतः शहरातील सांस्कृतिक संस्था, ज्येष्ठ कलावंत, जाणकार आणि तज्ञांच्या पुढाकाराने त्यांच्या कलांना उत्तेजन देवून व्यासपीठ निर्माण करणे. या कलांमध्ये प्रामुख्याने गायन, वादन, नाट्य, नृत्य, काव्य, निवेदन, वक्तृत्व, हस्तकला, शिल्पकला, चित्रकला, लोककला इ. चा समावेश राहील.

४) पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या संगीत अकादमीशी संलग्न सांस्कृतिक आणि कलेविषयक धोरण आणि त्यामधील उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी स्वतंत्र विभागाची निर्मिती करणे. या विभागाचे कामकाज यथायोग्यरीत्या होण्याकरीता सांस्कृतिक आणि कला क्षेत्रातील जाणकार, तज्ञ आणि अनुभवी तसेच शहरातील ज्येष्ठ, जाणकार, तज्ञ, अनुभवी कलावंतांची, संस्था प्रमुखांच्या सहकार्याने आणि समन्वयाने शहरात सांस्कृतिक आणि कलेविषयक अनेक उपक्रम राबविणे.

५) पिंपरी चिंचवड शहरात संगीत महोत्सव, जयंती महोत्सव, बालनाट्य महोत्सव, युवानाट्य महोत्सव, लावणी महोत्सव, साहित्य संमेलन, कवी संमेलन, मुशायरा, हास्य कवी संमेलन, लोक कला महोत्सव, औद्योगिक प्रदर्शन इ. चे आयोजन करणे. तसेच सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार आणि सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातल्या सर्व राज्यातल्या पारंपारिक संस्कृतीचे दर्शन घडविणा-या आणि राष्ट्रीय एकात्मतेवर आधारीत वैविध्यपूर्ण लोककला महोत्सवाचे खाजगी संस्थेच्या सहकार्याने आयोजन करणे, त्याच महोत्सवात भारताच्या विविध राज्यातील खाद्य संस्कृतीचेही आयोजन करणे.

६) पिंपरी चिंचवड शहरात सुमारे तीन हजार आसन क्षमता असलेले भव्य असे बहुउद्देशीय प्रेक्षागृह निर्माण करणे.

७) पिंपरी चिंचवड शहरात असलेली प्रेक्षागृहे आणि नाट्य गृहे यांचे दर, परिरक्षण, विविध सुविधा तसेच म.न.पा.च्या उत्पन्न वाढीसाठी अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

८) भारत देशातील आणि महाराष्ट्र राज्यातील वैविध्यपूर्ण कलांमध्ये प्रामुख्याने गायन, वादन, नृत्य, लोककला, शिल्पकला, हस्तकला, चित्रकला, नाट्य, चित्रपट, साहित्य, काव्य, मराठी लेखन तसेच बोलन पद्धती, वाक्य प्रयोग, भाषाशास्त्र, संतसाहित्य, प्राच्यविद्या, फोटोग्राफी, महिलांच्या पाककला, वेषभूषा, व्यक्तिमत्व विकास, रांगोळी, मेहंदी इ. कलाप्रकारांसाठी आणि बालकांमधील उपजत कलागुणांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करणे. त्याच

प्रमाणे कलाकारांमधून नाविन्यपूर्ण कलांची निर्मिती होताना त्या कलावंतांना प्रोत्साहित करुन त्यांच्या मधील या विशेष कलागुणांचा विकास करणे.

९) पिंपरी चिंचवड शहरात महाराष्ट्रातील सतांचे कार्य आणि त्यांच्या विचारांचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासनास पैठण येथे अभिप्रेत असलेले संतपीठ शासनाच्या मदतीने एक महत्वाचे केंद्र म्हणुन विकसित करणे.

१०) महिलांविषयक सांस्कृतिक दृष्टीकोनाचा विचार करताना स्त्रियांमधील कलागुणांचा आणि त्यांच्या जीवनमुल्यांचा प्राधान्याने विचार करणे महत्वाचे आहे. सर्व कलाविष्कारांत स्त्रिया अग्रेसर होत असून त्यांच्या मधील वैविध्यपूर्ण कलागुणांना प्राधान्य देवून त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.

११) पिंपरी चिचंवड शहरासाठी सांस्कृतिक आणि कला धोरणाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यासाठी म.न.पा. च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात स्वतंत्र लेखाशिर्षाखाली विशेष तरतूद करणे.

# परिशिष्ट ‘अ’

## सांस्कृतिक आणि कलेच्या क्षेत्रात शिक्षण आणि सहभाग घेवू इच्छिणा-या कलावंतांची पात्रता आणि निकष –

१) विविध कलांचे शिक्षण घेवू इच्छिणारे विद्यार्थी, युवक, युवती, महिला, ज्येष्ठ नागरीक, अंध, अपंग इ. हे पिंपरी चिंचवड शहराचे नागरीक असावेत.

२) म.न.पा.च्या विविध महोत्सवात, उपक्रमात, शैक्षणिक अभ्यासक्रमात सहभागी होवू इच्छिणा-या कलाकारांना संगीत अकादमीकडे रीतसर अर्ज करुन सभासद व्हावे लागेल.

३) पिं.चिं.म.न.पा. संगीत अकादमी, सांस्कृतिक आणि कला विभाग यांच्या माध्यमातून निश्चित करण्यात येणा-या अटी, नियम, निकष इ. सर्व कलाकारांना लागू राहतील.

४) शहरातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल (शासकीय नियमावलीनुसार पात्र) अशा सर्व स्तरातील होतकरु आणि गुणी कलावंतांना विविध कलांच्या शिक्षणासाठी विशेष सवलत देण्यात येईल.

# परिशिष्ठ ब

## म.न.पा. संगीत अकादमी, सांस्कृतिक आणि कला विभाग यांचे स्वरुप आणि कार्य प्रणाली-

**म.न.पा. संगीत अकादमी –**

१.१) संगीत अकादमीचे विस्तारीकरण करणे.

१.२) शहरात सध्या पिंपरी, चिंचवड आणि निगडी येथे गायन आणि वादन यांचे शिक्षण दिले जाते. या व्यतिरिक्त म.न.पा.च्या अ, ब, क व ड प्रभागात किमान एक ठिकाणी गायन, वादन आणि नृत्य या कलांसाठी शाखांची निर्मिती करणे.

२) म.न.पा. संगीत अकादमी संलग्न सांस्कृतिक आणि कलाविषयक विभागाची निर्मिती करणे. हे काम यशस्वीरीत्या करण्याकरीता संगीत शिक्षक, कर्मचारी त्याच प्रमाणे विविध कला क्षेत्रातील तज्ञ कलावंतांना मानद सल्लागार म्हणून नियुक्ती करणे जेणे करुन विविध कलां विषयक कामकाज अधिक प्रभावीपणे करणे सुलभ होईल.

३) संगीत अकादमी, सांस्कृतिक आणि कला विभागामध्ये कला शिक्षक, संगीत शिक्षक, कर्मचारी यांची नियुक्ती करणे, उल्लेखनीय कामगिरी करणा-या गुणवान संगीत शिक्षकांना प्रोत्साहित करुन त्यांच्या चांगल्या कामांचा गौरव करणे, त्यांना पदोन्नती देणे. शासन स्तरावरील सर्व योजनांचा लाभ मिळविणेकरीता विशेष प्रयत्न करणे.

४) विविध सांस्कृतिक संस्थांच्या सहकार्याने आणि समन्वयाने विविध सांस्कृतिक उपक्रम राबविणे. केंद्र शासन, राज्य शासनाच्या योजनांचा, अनुदानांचा लाभ कलावंतांना मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करणे. म.न.पा.चे विविध कला क्षेत्रातील विविध महोत्सव, स्पर्धा, शिबिरे यांचे आयोजन करणे.

## परिशिष्ठ क

## पिंपरी चिंचवड शहरात विविध सांस्कृतिक महोत्सव, जयंती महोत्सव, विविध संमेलने, विविध स्पर्धा, सराव शिबिरे, औद्योगिक प्रदर्शने, तसेच कले विषयक अनेक नवनवीन उपक्रमांची निर्मिती करुन त्यांचे आयोजन करणे.

१) पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे या महान नेत्यांच्या जयंती निमित्ताने सामाजिक प्रबोधनाचे, विचार मंथनांचे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे. कवी संमेलन, परिसंवाद, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, नाट्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आयोजित करणे. महोत्सवामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांच्या विचार मंथनाचे आणि सामाजिक प्रबोधनांच्या कार्यक्रमाचे आयोजन करणे.

२) स्वरसागर संगीत महोत्सवाचे आयोजन प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्याच्या दुस-या सप्ताहात शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी करणे. दरवर्षी स्वतंत्र समिती मार्फत देण्यात येणा-या स्वरसागर पुरस्काराची रक्कम पन्नास हजार रोख, मानपत्र, शाल, श्रीफळ असे राहील. पुरस्कार विजेत्या कलावंताची वाहतूक आणि निवासाची व्यवस्था केली जाईल. स्थानिक कलावंतांना तसेच संगीत अकादमीमधील विद्यार्थ्यांना एक स्वतंत्र दिवस राखून ठेवणे. महोत्सव सलग चार दिवसांचा आयोजित करुन त्यामध्ये शास्त्रीय संगीत, गायन, वादन, नृत्य, सुगम संगीत आणि बहुभाषिक कलावंतांचा समावेश असावा असे नियोजन करणे.

३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार आणि सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातल्या सर्व राज्यातल्या पारंपारिक संस्कृतीचे दर्शन घडविणा-या लोककला, हस्तकला, शिल्पकला, चित्रकला अशा प्रकारच्या कलांचे वर्षातून एकदा आयोजन करणे. या लोककलांच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचे शहरवासियांना दर्शन घडविणे आणि सांस्कृतिक कलांची देवाण – घेवाण करणे.

४) सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार आणि सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातल्या सर्व राज्यातल्या खाद्य संस्कृतिचे आयोजन राष्ट्रीय एकात्मतेवर आधारीत लोककला महोत्सवांमध्ये करणे.

५) पिंपरी चिंचवड शहरात वर्षातून एकदा ऑटोक्लस्टरच्या सहकार्याने आंतराष्ट्रीय स्तरावरील औद्योगिक प्रदर्शन ( Industrial Exhibition ) शहरातील उद्योजकांच्या आणि औद्योगिक संस्थांच्या सहकार्याने आणि समन्वयाने आयोजित करणे. त्याच प्रमाणे क्रेडाईच्या सहकार्याने स्थापत्य अभियांत्रिकी विषयक पुण्यात आयोजित करण्यात येणा-या Constro चे धर्तीवर प्रदर्शन आयोजित करणे.

६) पिंपरी चिंचवड शहरात बालनाट्य महोत्सव, युवानाट्य महोत्सव, साहित्य संमेलन, कवी संमेलन, मुशायरा, हास्य कवी संमेलन ( मराठी व हिंदी ), महाराष्ट्रातील लोककलांचा महोत्सव, लावणी महोत्सव, हस्तकला, शिल्पकला, चित्रकला प्रदर्शन, छायाचित्रांचे प्रदर्शन, सराव शिबिरे, व्याख्याने, स्पर्धा इ. चे आयोजन खाजगी संस्थाच्या माध्यमातून करणे.

७) महाराष्ट्राची लोकसंस्कृती, लोकसाहित्य, लोककला (लावणी, गोंधळी, वासुदेव, डवरी, भाट, बहुरुपी (रायरन्द), पोतराज, कडकलक्ष्मी, मसणजोगी, कुरवंजी (कोरवंजी), नंदीवाले, सुंबरान गाणारे धनगर, डक्कलवार, दरवेशी, डोंबारी, ठाकरी गीत/नृत्य, कोळी गीत/नृत्य, बालेनृत्य इ.), लोकवाद्ये (सुंदरी, सनई, कलाट, पायपेटी, मृदंग, पखवाज, टाळ, झांज, चिपळी, डफ, ढोल, ताशा, नगारा, टिमकी, चौंडके, कडे, संबळ, हलगी, घुमके, करंडा, लेझीम, तुणतुणे, कोका, एकतारी, वीणा, झंगट, शंख, तुतारी(शिंग), पिपाणी, बासरी, पावा इ. ) ग्रामीण जीवन संस्कृती, विविध शहरातील, गावांमधील, खेड्या-पाड्यामधील भाषा शैलीचा अभ्यास संकलित व जतन करण्याच्या दृष्टीने सांस्कृतिक कार्यक्रमांचे ( लोककला महोत्सव ) आयोजन करणे.

८) पिंपरी चिंचवड शहरातील गायन, वादन व नृत्य या कलाप्रकारात निपूण असलेल्या कलावंतांना प्रोत्साहित करण्यासाठी गायन, वादन व नृत्याची वर्षातून एकदा म.न.पा. तसेच सांस्कृतिक संस्था आणि प्रायोजक यांच्या सहकार्याने स्पर्धा आयोजित करणे. या क्षेत्रातील मान्यवर व तज्ञ समितीमार्फत स्पर्धेचे परिक्षण

करुन विजेत्या कलावंतांना ‘ उत्कृष्ट गायक ’, ‘ उत्कृष्ट वादक ’ , ‘ उत्कृष्ट नर्तक ’ अशा पुरस्कारांनी सन्मानित करणे.

९) पिंपरी चिंचवड शहरामधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता आंतरमहाविद्यालयीन “ नाट्य एकांकिका स्पर्धा ” आयोजित करणे. ही स्पर्धा म.न.पा. तसेच सांस्कृतिक संस्था आणि प्रायोजक यांच्या सहकार्याने आणि समन्वयाने वर्षातून एकदा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आयोजित करणे. नाट्य क्षेत्रातील मान्यवर व तज्ञ समितीमार्फत स्पर्धेचे परिक्षण करुन विजेत्या कलावंतांना उत्कृष्ट अभिनय, लेखन, संगीत आणि उत्कृष्ट दिग्दर्शन अशा पुरस्कारांनी सन्मानित करणे. उत्कृष्ट नाट्य एकांकिकेस “पिंपरी चिंचवड करंडक” देवून सन्मानित करणे.

१०) पिंपरी चिंचवड शहराचा कला व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये झालेला विकास व पिंपरी चिंचवड शहराची जडणघडण होताना म.न.पा.ने शहरासाठी राबविलेल्या सर्व उल्लेखनीय विकास योजनांसह शहराचे गौरव गीत दृक - श्राव्य माध्यमाद्वारे तयार करुन त्याकरीता स्थानिक मान्यवर कवींकडून गीत तयार करणेचे प्रस्ताव मागविणेत येतील. प्राप्त झालेल्या गीतांचे नामवंत कवींकडून परीक्षण करण्यात येईल, त्यामधील एक उत्कृष्ट गीत जाणकार आणि सुप्रसिद्ध संगीतकाराकडून स्वरबद्ध करुन घेणेत येईल. तसेच मान्यवर दिग्दर्शकाकडून त्याची चित्रफित तयार करणेत येईल. शहराचा सांस्कृतिक व कलात्मक एकोपा या गीतामध्ये दिसेल. शहराचे कलावैभव आणि पिंपरी चिंचवड शहराची स्वतंत्र कलात्मक ओळख जगासमोर येईल. वरील गीतामध्ये पुरातन वास्तुंचा व नविन प्रकल्पांचा समावेश राहील. हे गीत वेळोवेळी म.न.पा.च्या महोत्सवांमध्ये, उपक्रमांमध्ये दाखविण्यात येईल, जेणे करुन या गीतातून महानगरपालिकेचे कार्य आणि शहराची ओळख सर्वांना होईल.

# परिशिष्ठ ड

## शहरातील प्रेक्षागृहे, नाट्यगृहे, सांस्कृतिक हॉल, आणि तत्सम स्वरुपाच्या इमारतींचे विस्तारीकरण, परिरक्षण इ. बाबत तसेच नियोजित प्रेक्षागृहे, सांस्कृतिक हॉल, संग्रहालय, संतपीठ इ. निर्माण करणे बाबत.

१) पिंपरी चिंचवड शहरात प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड, कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी, आचार्य अत्रे सभागृह, संततुकाराम नगर या मधील सुविधा, परीरक्षण, नुतनीकरण, विस्तारीकरण, कर्मचारी नियुक्ती, विविध कार्यक्रमांचे आयोजन, दर इ. बाबत वेळोवेळी सुधारणा करणे.

२) पिंपरी चिंचवड शहरात सुमारे तीन हजार आसन क्षमता असलेले भव्य असे बहुउद्देशीय प्रेक्षागृह निर्माण करणे. गायन, वादन, नृत्य, अभिनय अशा कलांच्या सरावांसाठी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी बहुउद्देशीय हॉलची निर्मिती करणे. त्याच प्रमाणे कलासंकुलाची निर्मिती करुन त्यामध्ये नाटक, संगीत, नृत्य, चित्रकला, शिल्पकला, छायाचित्रकला, लोककला, आदिवासी लोककला, हस्तकला इ. साठी प्रशिक्षण, तांत्रिक सादरीकरण इ. साठी सोयी असतील.

३) पिंपरी चिंचवड शहराचे ऐतिहासिक महात्म्य, वास्तु, व्यक्ति आणि त्यांचे कार्य जतन करताना, पिंपरी चिंचवड शहराच्या निर्मिती पासूनची व विविध क्षेत्रात सर्व स्तरावर होत जाणा-या विकासाची माहिती पिंपरी चिंचवड संग्रहालयाची (Pimpri Chinchwad Museum) नियोजित इंडस्ट्रियल म्युझियममध्ये निर्मिती करुन त्यामध्ये संकलित करणे, जतन करणे आणि वृद्धींगत करणे. सदरचे संग्रहालयामध्ये पिंपरी चिंचवड शहराची झालेली जडणघडण म.न.पा.ने पुरविलेल्या मुलभूत सुविधा उद्याने, प्रकल्प, पर्यावरण, ग्रेडसेपरेटर, उड्डाणपूल, पर्यावरण इ. त्याच प्रमाणे शहरातील प्रथितयश उद्योग आणि त्यांचा झालेला कालबद्ध विकास अशा सर्व बाबींचा अंतर्भाव असेल ज्यामुळे पर्यटकांना, अभ्यागतांना आणि नागरीकांना या शहराची ओळख आणि महत्व पटू शकेल.

४) महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक धोरणामध्ये अंतर्भाव असणारी नियोजित शिवकिल्ले मालिका योजने प्रमाणे म.न.पा.चे नियोजित फोर्ट म्युझियमध्ये किल्ल्यांच्या ठिकाणी इतिहास जिवंत करणारी आभास सृष्टी महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाच्या पुरातत्व विभागाच्या मदतीने निर्माण करणेबाबत विचार करणे.

५) महाराष्ट्र शासनास पैठण येथे अभिप्रेत असलेले परंतु अजून न झालेले संतपीठ शासनाच्या मदतीने पिंपरी चिंचवड शहरात निर्माण करणे. महाराष्ट्रातील संताचे कार्य जतन करतांना सर्व धर्मातील व जातीतील मानवतावादाचा पुरस्कार करणा-या संताच्या आणि महात्म्यांच्या विचारांचे आणि कार्यांचे अध्ययन आणि अभ्यास करणारे केंद्र म्हणुन विकसित करणे. शिक्षक अन्य म.न.पा. व शासकीय कर्मचारी तसेच सर्वसामान्य जिज्ञासू यांच्यासाठी तसेच विद्यापीठ पातळीवरील संदर्भालय आणि विविध संतांच्या विचारांचा / कार्याचा अभ्यास करण्यासाठी एक महत्वाचे केंद्र म्हणुन कार्यरत राहील.

६) पिंपरी चिंचवड शहरातील गायन, वादन, नृत्य आणि नाट्य या क्षेत्रात शिक्षण घेणा-या होतकरु आणि उद्ययोन्मुख कलाकारांना सरावासाठी म.न.पा.मार्फत बांधणेत आलेल्या सांस्कृतिक इमारती व उद्यानांमधील विरंगुळा केंद्रे नाममात्र शुल्कामध्ये उपलब्ध करुन देणे.

# परिशिष्ट इ

## प्रयोगात्मक, दृश्यात्मक आणि चित्रपट

१) प्रयोगात्मक कलाप्रकारांमध्ये नाटक, संगीत, नृत्य आणि लोककलांचा समावेश तसेच दृश्यात्मक कलाप्रकारात चित्रकला, शिल्पकला, छायाचित्रकला, हस्तकला यांचा समावेश असून चित्रपट हा स्वतंत्र कलाप्रकार आहे. या कलाप्रकारांमध्ये कलावंतांची अभिरुची लक्षात घेता, त्यांना या कलाप्रकारांमध्ये प्रोत्साहित करणे आणि सहकार्य करणे.

२) प्रयोगात्मक, दृष्यात्मक आणि चित्रपट या कलाप्रकारांसाठी राज्य पुरस्कार प्राप्त वयोवृद्ध व ज्येष्ठ कलावंतांना शासकीय अनुदान मिळवून देण्यास प्रयत्न करणे. हा कलावंत पिंपरी चिंचवड शहराचा नागरीक असावा आणि त्याचे शहरातील किमान वास्तव्य पंधरा वर्षांचे असावे.

३) नाट्य आणि चित्रपट कलाक्षेत्रात पदार्पण करणा-या नवोदित आणि होतकरु कलावंतासाठी प्रायोगिक रंगभूमीसाठी सर्व सोयींनी सुसज्ज आणि सर्व सोयींनी युक्त अशा हॉलची निर्मिती करणे, नाट्य व चित्रपट क्षेत्रातील तज्ञ आणि मान्यवरांकडून त्यांना प्रशिक्षण देणे. प्रशिक्षित कलावंतांना व्यावसायीक रंगभूमीवर नाट्यप्रयोग सादर करण्यासाठी प्रोत्साहित करणे. तसेच होतकरु नवोदित चित्रपट कलावंतांना शहरातील सांस्कृतिक संस्थांच्या आणि ज्येष्ठ कलावंतांच्या माध्यमातून नाटक आणि चित्रपटात भूमिका मिळवून देण्यास प्रयत्न करणे. त्यांना शासकीय अनुदानाचा लाभ मिळवून देण्यास प्रयत्न करणे.

# परिशिष्ट प

## महिलांविषयक सांस्कृतिक दृष्टिकोन

१) पिंपरी चिंचवड शहरातील महिलांविषयक सांस्कृतिक दृष्टिकोनाचा विचार करताना त्यांच्या मधील सांस्कृतिक कलागुणांचा आणि जीवनमुल्यांचा विकास सांधताना त्यांच्यामधील सुप्तगुणांना वाव मिळवून देण्यासाठी सर्व कलाविष्कारात त्या अग्रेसर राहतील. यासाठी म.न.पा. स्तरावर आणि सांस्कृतिक / सामाजिक संस्थांच्या माध्यमातून विशेष प्रयत्न करणे.

२) गायन, वादन, नृत्य, वेषभूषा, पाककला, रांगोळी, मेहंदी, व्यक्तिमत्व विकास, नाट्य कला, चित्रपट, हस्तकला अशा सर्व कलांमध्ये महिलांनी आपल्या कलांचा विकास करताना त्यांचेसाठी स्वतंत्र शिबिरांचे, स्पर्धांचे प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करुन त्यांना प्रशिक्षित करणे.

३) पिंपरी चिंचवड शहरात आयोजित करण्यात येणा-या विविध सांस्कृतिक महोत्सवामध्ये त्यांना प्रोत्साहित करुन सहभाग वाढविणे. त्यांना सर्व कलाविष्कारात सहभागी होण्याकरीता सुसंधी उपलब्ध करुन देणे.

४) पिंपरी चिंचवड शहरातील महिलांसाठी वर्षातून एकदा महिला मेळाव्याचे आयोजन करुन त्यामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे, प्रदर्शनांचे विविध कलाकौशल्य प्रकारांच्या सादरीकरणासाठी संमेलनाचे आयोजन करणे.

# <u>परिशिष्ट फ</u>

## <u>सांस्कृतिक आणि कला धोरणासाठी म.न.पा. अंदाजपत्रकात आर्थिक तरतूद करणे.</u>

सांस्कृतिक आणि कला धोरणामध्ये नमूद बाबींसाठी म.न.पा.च्या अंदाजपत्रकात सांस्कृतिक आणि कलानिधीसाठी विशेष तरतूद करणे. वर्षभरात या धोरणांतर्गत विविध स्वरुपाचे सांस्कृतिक महोत्सव, स्पर्धा, संमेलने इ. अनुषंगीक सर्व योजनांसाठी मा. आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मा. महापालिका सभेच्या मान्यतेने अंमलबजावणी करण्यात येईल.